महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २३ वे दिनांक : ११/०१/२०२६ वार : रविवार

## भाजप हा खाणाऱ्यांचा अन् बलात्काऱ्यांचा पक्ष - प्रकाश आंबेडकर



**मुंबई** : वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडर यांनी शनिवारी पुन्हा एकदा सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला. भाजप हा आतापर्यंत केवळ खाणाऱ्यांचा पक्ष होता. तो आता बलात्काऱ्यांचा पक्ष झाला आहे. या पक्षाने बदलापूर बलात्कार प्रकरणातील आरोपीला स्वीकृत नगरसेवकपद दिले आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबातील मुली सुरक्षित ठेवायच्या असतील तर भाजपला मतदान करू नका, असे ते म्हणालेत.

बदलापूर येथील एका शाळेत काही महिन्यांपूर्वी २ चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाला होता. पोलिसांनी या प्रकरणी अक्षय शिंदेसह तुषार आपटेवर गुन्हा दाखल केला होता. पण आता भाजपने या तुषार आपटेलाच कुळगाव बदलापूर नगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक पद बहाल केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर आपटेने आपल्या पदाचा राजीनामा दिला. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकरांनी भाजपच्या मतदारांना आपल्या कुटुंबातील मुले, मुली सुरक्षित ठेवण्यासाठी यावेळी भाजपला मतदान न करण्याचे आवाहन केले आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजप व संघाच्या लोकांना आपल्या कुटुंबातील मुले व मुली शाबूत ठेवायच्या असतील तर भाजपला मतदान करू नका. कारण, बदलापूरमध्ये जे कांड झाले होते, त्यातील सूत्रधाराला भाजपने स्वीकृत नगरसेवकाचे पद दिले आहे. भाजप हा आतापर्यंत खाणाऱ्यांचा पक्ष होता, पण आता तो बलात्काऱ्यांचा पक्ष झाला आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना आता भाजप प्रतिष्ठित नागरीक म्हणून आपल्या पक्षात स्थान देत आहे. भाजप व संघाने हा व्यभिचाराचा मार्ग अवलंबला आहे. हे थांबवायचे असेल तर संघ व भाजपच्या ज्या लोकांना आपले कुटुंब सुरक्षित रहावे असे वाटत असेल तर त्यांनी महापालिका निवडणुकीत भाजपला मतदान करू नये.

भाजपचे हे जे नवीन कॅरेक्टर उभे राहत आहे, त्याला आम्ही बदलू शकत नाही. या कॅरेक्टरला बदलायचे असेल तर भाजप व संघाला मतदान करणारा मतदारच ते बदलू शकतो. मी या सर्वांना आवाहन करतो की, मतभेद निश्चितपणे आहेत. टोकाचे मतभेद आहेत. पण केवळ मतभेद आहेत म्हणून आम्ही व्यभिचाराचा मार्ग अवलंबलेला नाही. भाजप व संघाने व्यभिचाराचा मार्ग अवलंबला आहे. ते थांबवणे आमच्या नव्हे तर तुमच्या हातात आहे.

हे थांबवायचे असेल तर या महापालिका निवडणुकीत भाजप व संघाच्या मतदारांनी भाजपला मतदान करू नये. हे केले तर तुमच्या नेतृत्वाला योग्य तो संदेश मिळेल. भ्रष्टाचारी व बलात्कारी लोकांना तुम्ही साथ देणार असाल तर आम्ही तुमच्या बरोबर नाही हा संदेश देऊन तुम्ही आपला पक्ष वाचवा असे मी आवाहन करतो, असे प्रकाश आंबेडकर संघ व भाजपच्या मतदारांना आवाहन करताना म्हणाले.

## दादागिरीची भाषा आम्हाला शिकवू नका, तो आमचा 'धंदा' - गुलाबराव पाटील



**अहिल्यानगर** : "आम्ही मंत्री पदाला लाथ मारून बाहेर पडलो आहोत. शंभर दिवस शेळीसारखे जगण्यापेक्षा दहा दिवस वाघासारखे जगू. त्यामुळे आम्हाला दादागिरीची भाषा शिकवू नका, तो आमचा जुना 'धंदा' आहे. आम्ही असेच आमदार झालो नाहीत. आम्हाला 302, 307 चांगलीच माहिती आहेत. ज्याच्यावर साधी एकही केस नाही, तो शिवसैनिक कसला?" अशा आक्रमक शब्दांत शिवसेना नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर आणि स्थानिक पोलिसांवर हल्लाबोल केला. ते अहिल्यानगर येथील सभेत बोलत होते.

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. २०२३ मध्ये कार्यकाळ संपलेल्या अहिल्यानगर महानगरपालिकेत गेल्या दोन वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत. त्यामुळे येथील महानगरपालिका निवडणूक विशेष लक्षवेधी ठरणार आहे. २००३ मध्ये या महानगरपालिकेत गेल्या २० वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सर्वच पक्षांचे महापौर झाले आहेत. दोन वर्षांनंतर निवडणूक होत असल्याने सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांसाठी आयोजित सभेत गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

अहिल्यानगरच्या पाणीपुरवठा योजनेवरून गुलाबराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला थेट आव्हान दिले. ते म्हणाले, "माझे राष्ट्रवादीवाल्यांना चॅलेंज आहे, नगरची पाणीपुरवठा योजना या पठ्ठ्याने मंजूर केली आहे. 'पोरं तुम्ही पैदा करायची आणि बारसं आम्ही करायचं', हा धंदा आता चालणार नाही." अहिल्यानगर हा शिवसेनेचा अभेद्य बालेकिल्ला असून दिवंगत अनिल भैय्या राठोड येथून पाच वेळा निवडून आले होते, याची आठवणही त्यांनी करून दिली.

अहिल्यानगर शहरातील वाढत्या गुन्हेगारी आणि पोलिसांच्या भूमिकेवर बोट ठेवताना पाटील यांनी पोलिसांनाही दम भरला. "अहिल्यानगरचे पोलीस पिस्तूल घेऊन दादागिरी करतात. पण आम्हाला दाबायचा प्रयत्न करू नका. आम्ही रबरी चेंडूसारखे आहोत, जेवढे दाबाल तेवढी उंच उडी घेऊ. माझ्यावर चोरी, दरोडा किंवा बलात्काराच्या नाही, तर आंदोलनाच्या 35 केसेस आहेत. 'आय लव्ह यू' केसेस आहेत त्या," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये जोश भरला.

महाविकास आघाडी आणि बंडाचा संदर्भ देताना पाटील म्हणाले, "आमच्याच मित्राने आमच्याशी झालेले 'लव्ह मॅरेज' तोडले. आमच्याशी युती करताना शेवटपर्यंत 'पप्पी घे, पप्पी घे' केले आणि नंतर आम्हाला सोडून दिले. काल कोणीतरी 50 खोक्यांवरून बडबडले, पण जर आम्ही उठाव केला नसता तर तुमची आणि राज्याची स्थिती काय झाली असती? एकनाथ शिंदे आणि गुलाबराव पाटील यांना दाढी आहे, त्यामुळे शिंदे आले नाहीत तरी त्यांची पठ्ठ नगरकरांना जागे करायला आला आहे."

'लाडकी बहीण' योजनेवर टीका करणाऱ्यांचा समाचार घेताना पाटील म्हणाले, "ज्यांचा जन्मच सोन्याचा चमचा तोंडात घेऊन झाला आहे, त्यांना 1500 रुपयांची किंमत काय कळणार? आम्ही जात न पाहता राज्यातील प्रत्येक गरजू महिलेला हक्काचे पैसे दिले आहेत."

भाषणाच्या शेवटी गुलाबराव पाटील यांनी आपल्या खास शैलीत शायरी म्हणत विरोधकांना आणि एमआयएमसोबतच्या युतीला टोला लगावला. "आंखे होकर बने अंधे तो बिजली क्या जाने, जिस अंधे को चिराग न मालूम वो उजाला क्या जाने, जिसे लढना ना मालूम वो तीर-तलवार क्या जाने!" शिवसेना ही विचारांवर चालणारी संघटना असून पक्ष संपवण्याची वल्गना करणाऱ्यांना जनताच उत्तर देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## संभाजीनगरच्या भावी नगरसेवकांनो खबरदार

**छत्रपती संभाजीनगर** : शहरासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या २,७४० कोटी रुपयांच्या नवीन पाणीपुरवठा योजनेबाबत मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. सध्या सुरू असलेल्या महापालिका निवडणूक प्रक्रियेनंतर नव्याने निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींनी या योजनेच्या कामात कोणताही हस्तक्षेप करू नये, असा स्पष्ट आणि ठाम इशारा न्यायालयाने दिला आहे. निवडणूक निकालानंतर लोकनियुक्त मंडळ महापालिकेचा कारभार हाती घेणार असले तरी, या दरम्यान सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी न्यायालयाने आधीच सावधगिरीचा इशारा दिला आहे.

या संदर्भातील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात पार पडली. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, या योजनेच्या कामात कोणत्याही स्वरूपाचा अडथळा सहन केला जाणार नाही. जाणूनबुजून कामात व्यत्यय आणणे हे थेट न्यायालयाचा अवमान मानले जाईल. अडथळा निर्माण करणारी व्यक्ती कोणत्याही पदावर किंवा हुद्द्यावर असली, तरी तिच्याविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाईल, असा अत्यंत कठोर इशाराही न्यायालयाने यावेळी दिला. या स्पष्ट भूमिकेमुळे प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

सुनावणीदरम्यान न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, या भव्य पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ३,७०० अश्वशक्तीचे तीन मोठे पंप बसविण्यात येणार आहेत. यापैकी एक पंप आधीच बसवण्यात आला असून, त्याची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. मात्र जॅकवेलसह २,५०० मिमी व्यासाच्या जलवाहिनीत वेल्डिंग प्रक्रियेतून निर्माण झालेला कचरा आणि साचलेला गाळ मोठ्या प्रमाणावर आढळून आला आहे. हा गाळ आणि कचरा काढण्यासाठी पंप सतत चालू ठेवावा लागणार असून, एक पंप सुरू ठेवल्यास ही प्रक्रिया सुमारे एका महिन्यात पूर्ण होईल, तर दोन पंप वापरल्यास ती सुमारे १८ दिवसांत पूर्ण होऊ शकते, अशी माहिती जीव्हीपीआर कंपनीने न्यायालयाला दिली.

योजनेतील पायाभूत कामांबाबतही न्यायालयात सविस्तर माहिती देण्यात आली. २,५०० मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच जॅकवेलच्या 'ए पोर्शन'चा स्लॅबही पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. मात्र, शहरातील अंतर्गत जलवाहिन्यांचे काम अजून मोठ्या प्रमाणावर अपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले. एकूण १५ झोनपैकी पहिल्या टप्प्यातील १२० किलोमीटर आणि दुसऱ्या टप्प्यातील २३७ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांचे काम अद्याप शिल्लक आहे. या कामासाठी सुमारे एक हजार कामगारांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात केवळ ५०० कामगार सध्या कार्यरत असल्याची बाब सुनावणीदरम्यान समोर आली. त्यामुळे कामाच्या गतीवर परिणाम होत असल्याचे अप्रत्यक्षपणे स्पष्ट झाले. याशिवाय, या पाणीपुरवठा योजनेतील एकूण ५३ जलकुंभांपैकी आतापर्यंत केवळ नऊ जलकुंभांचेच काम पूर्ण झाले असल्याची माहिती देण्यात आली. उर्वरित जलकुंभांचे काम वेगाने पूर्ण करण्याची गरज असल्याचेही या सुनावणीत अधोरेखित झाले.

आर्थिक बाबींविषयी माहिती देताना महापालिकेच्या वतीने ॲड. संभाजी टोपे यांनी सांगितले की, शासनाकडून कर्ज स्वरूपात मिळालेले ८२२ कोटी रुपये टप्प्याटप्प्याने आणि कामाच्या प्रगतीनुसार संबंधित कंपनीला अदा करण्यात येत आहेत. जीव्हीपीआर कंपनीने जीवन प्राधिकरणाकडे सादर केलेली बिले तपासून ती महापालिकेकडे पाठवली जातात. सध्या २१.१८ कोटी रुपयांचे बिल महापालिकेकडे प्राप्त झाले असून, त्याची तपासणी करून पुढील १५ दिवसांत ही रक्कम कंपनीला दिली जाईल, असे न्यायालयाला सांगण्यात आले.

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ जानेवारी २०२६


## पेफीचे कार्यकारी सचिव पीयूष जैन यांची जालन्यातील जेईएस महाविद्यालयास भेट



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** नुकत्याच येथील जे ई एस महाविद्यालयाचे क्रीडा विभागात उपलब्ध क्रीडा सोय सुविधा आणि खेळाडूंसोबत संवाद साधण्याकरिता नवी दिल्ली येथील भारतीय शारीरिक शिक्षण संस्था पेफीचे प्रमुख आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण साईचे सदस्य डॉ. पीयूष जैन यांनी जालना शहरातील जेईएस महाविद्यालय येथे भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांच्यासह खेळाडूंना भेटले. तसेच त्यांच्यासोबत संवाद साधला.औद्योगिक क्षेत्रातील उपलब्ध सामाजिक दायित्व निधीचे उपयोग क्रीडा क्षेत्रात कसा करू शकतो आणि त्यामुळे तळा ~गळयातील खेळाडूना कशी मदत होईल या विषयावर त्यांनी माहिती दिली.डॉ. पीयूष जैन यांना क्रीडा क्षेत्रात अतुलनीय योगदान दिल्याबद्दल नुकत्याच त्यांना राष्ट्रपतीच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.फिजिकल एज्युकेशन फाऊंडेशन नवी दिल्लीचे संपूर्ण भारतात राज्यशी संलग्नित आहे. यातून विविध राष्ट्रीय राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरचे खेळाडूना प्रशिक्षण सराव आणि आर्थिक मदत दिली जाते,असे त्यांनी यावेळी सांगितले.विशेष म्हणजे जालना जिल्ह्यातील धनुर्विद्या खेळात चांगली प्रगती होत आहे आणि या मध्ये खेळाडू पदक मिळवती असेहि श्री जैन यांनी सांगितले.या वेळी महाराष्ट्र राज्य स्तरावर पदक विजेते, राष्ट्रीय खेळाडू युवराज बोधले आणि शुभम आंबेडकर यांचे गौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉक्टर हेमंत वर्मा उपस्थित होते.

## श्री आजुबाई विद्यालयात आनंद नगरी उपक्रमाला प्रतिसाद



**कन्नड (अरुण थोरात) :** विद्यार्थ्यांना व्यवहाराचे ज्ञान मिळावे आणि त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने श्री आजुबाई शिक्षण संस्था संचलितश्री आजुबाई माध्यमिक विद्यालय व कर्मवीर काकासाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय हिराईनगर, कन्नड येथे 'आनंद नगरी' या उपक्रमाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी केवळ वस्तूंची विक्रीच केली नाही, तर व्यावसायिक कौशल्यांचे धडेही गिरवले. कार्यक्रमाचे उदघाटन शाळेतील ज्येष्ठ पालक काशीबाई कारभारी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर देवकर आणि संचालिका वंदना देशमुख यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात म्हटले की, "आनंद नगरीमुळे विद्यार्थ्यांना गणितातील आकडेमोड, पैशांचे नियोजन आणि ग्राहकांशी संवाद साधण्याची कला शिकायला मिळते" विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ आणि हस्तकलेचे शाळेच्या मैदानात विद्यार्थ्यांनी सजवलेले ५० हून अधिक स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने चमचमीत खाद्यपदार्थ, भेळ, पाणीपुरी, सँडविच, वडापाव आणि घरगुती पिठलं-भाकरी अशा पदार्थांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.रिंग फेकणे यांसारख्या खेळांनी कार्यक्रमात अधिक रंगत आणली.व्यावहारिक शिक्षणाची शाळाविद्यार्थ्यांनी स्वतः स्टॉलचे नाव ठरवणे, वस्तूंचे दर निश्चित करणे आणि ग्राहकांना आकर्षित करणे अशा सर्व गोष्टी आनंदाने केल्या. विशेष म्हणजे, या संपूर्ण उपक्रमात 'प्लास्टिकचा वापर टाळा' असा संदेश देत पर्यावरणपूरक द्रोण आणि पत्रावळींचा वापर करण्यात आला.पालकांचा उदंड प्रतिसादआपल्या पाल्यांचे कौतुक पाहण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी मिळवलेला 'खरी कमाई'चा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. संध्याकाळी कार्यक्रमाची सांगता झाली, तेव्हा मुलांनी आपला नफा-तोटा स्वतः मोजून व्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

## व्यसन नको, निरोगी जीवन हवे हा संदेश नाटिकेतून प्रभावीपणे मांडला



**जालना :** व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासात अडथळा आणणारी एक समस्या म्हणून व्यसनाधीनतिकडे आपण बघितलं पाहिजे. अलीकडच्या काळात ही समस्या मोठ्या प्रमाणात युवकांमध्ये वाढत आहे. व्यसनामुळे आयुष्य उध्वस्त होते. समाजातील प्रतिष्ठा धुळीस मिळते. स्वतःबरोबर कुटुंबालासुद्धा याचे परिणाम भोगावे लागतात. म्हणून या समस्यांची समाजात जागृती होणे गरजेचे आहे. समाजात वाढत चाललेल्या व्यसनाच्या समस्येवर प्रबोधन करण्याच्या उद्देशाने राज्य पुरस्कार विजेते श्री.सतीश लिंगडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यसनमुक्तीवर लघुनाटिकेचे प्रभावी सादरीकरण केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना राष्ट्रीय सेवा योजनेच्या गोंदेगाव येथे सुरू असलेल्या सात दिवशीय श्रमसंस्कार शिबिरामध्ये रात्रीच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमात याचे आयोजन करण्यात आले होते.व्यसनामुळे कुटुंबाची होणारी वाताहत, यासह व्यसनमुक्तीकडे जात असताना येणाऱ्या अडचणी यांचे वास्तवदर्शी चित्रण त्यांनी आपल्या लघुनाटीकेमधून केले. कलाकारांच्या सशक्त अभिनयामुळे प्रेक्षकांवर खोलवर परिणाम झाला. “व्यसन नको, निरोगी जीवन हवे” हा संदेश नाटिकेतून प्रभावीपणे मांडण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. निशिकांत लोखंडे यांनी व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी युवकांची भूमिका यावर विचार व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. उद्धव थोरवे, प्रा राजक्रांती वलसे, प्रा. अभिजीत भुतेकर यांच्यासह स्वयंसेवक व गावकरी उपस्थित होते.

## विद्यार्थी - युवकांसाठी अभिनय कार्यशाळेचे आयोजन : एसएफआय

**छत्रपती संभाजीनगर :** स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) आणि डायनॅमिक ॲक्टिंग ॲकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने उद्या रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळा दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत पार पडणार आहे.या कार्यशाळेचस मार्गदर्शन सुप्रसिद्ध अभिनेते श्री. नंदु भुरे करणार असून, अभिनय क्षेत्रात आवड असणाऱ्या तरुण-तरुणींना प्रात्यक्षिकासह अभिनय प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. “आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव द्या!” या संकल्पनेवर आधारित ही कार्यशाळा १४ वर्षांवरील सर्वांसाठी खुली असून प्रवेश पूर्णतः मोफत आहे.कार्यशाळेचे स्थळ:महात्मा गांधी भवन, विभागीय ग्रंथालयाजवळ, समर्थनगर ते सिल्लेखाना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.नोंदणीसाठी इच्छुकांनी आपले नाव खालील क्रमांकांवर व्हॉट्सअॅपद्वारे पाठवावे, असे आयोजकांनी कळविले आहे.मनीषा बल्लाळ : ९८६०२ ३०१४८अरुण मते : ७६२०७ ८४६६२सुरज देवकर : ७५१७९ २१७३२ अभिनय क्षेत्रात रस असलेल्या तसेच या क्षेत्राची ओळख करून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी असून, जास्तीत जास्त तरुणांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) च्या वतीने करण्यात आले आहे.अरुण मतेजिल्हाध्यक्ष एस एफ आयछत्रपती संभाजीनगर


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ जानेवारी २०२६


## आता फक्त लढायचं...

ध्यास मनी घेऊनीया लढण्याचा, आता फक्त लढायचं।
अन् काहिही झालं तरी, आता मागे नाही सरायचं।।
जगतानाच मिळत असते, आपल्याया नवी दिशा।
त्या दिशेतूनच शोधायची असते, नविन आशा।
आशेचे स्वप्न मनाशी बाळगून, पूर्ण करायचं।।
अन् काहिही झालं तरी...

नाती गोती मिळतच असतात, जिवनाच्या प्रवासात।
ते विविध रंगापरी आपलं, आयुष्य रंगवित असतात।
पण कोणतं नातं जपायचं, अन् कोणतं नाही हे ठरवायचं।।
अन् काहिही झालं तरी...

जिवनामध्ये खुप सारा लपलेला असतो आनंद।
पण दु:ख घेऊन, रडत बसायचं नसतं।
नव्या उम्मेदीनं, नव्या जिद्दीनं पुन्हा उठून लढायचं।।
अन् काहिही झालं तरी...

हरविलेला स्वत:चा आत्मविश्वास पुन्हा मिळवायचा।
मि काय केलं? का केलं? हे विसरुन जायचं।
मी कोण? व काय करु शकतो याकडे लक्ष्य केंद्रित कराचं।।
अन् काहिही झालं तरी आता मागे नाही सरायचं...
आता मागे नाही सरायचं !




**- क्रांतीपाल सिरसाट**
सामाजिक कार्यकर्ता
9325644182


## विकसित भारत शिक्षण अधीक्षण विधेयक : उच्च शिक्षणावर होणारे विनाशकारी परिणाम

केंद्रीय मंत्रिमंडळाने विकसित भारत शिक्षण अधीक्षण विधेयकाला जे पूर्वी भारतीय उच्च शिक्षण आयोग (HECI) विधेयक म्हणून ओळखले जात होते मंजुरी देणे हा भारतीय शिक्षणातील एक निर्णायक क्षण आहे, पण तो सकारात्मक अर्थाने नाही. "विखुरलेली" नियामक व्यवस्था सोपी करण्यासाठी सुधारणा म्हणून हे विधेयक मांडले गेले आहे; पण प्रत्यक्षात ते आधीच ढासळत चाललेल्या उच्च शिक्षण व्यवस्थेला अंतिम धक्का देणारे ठरण्याची शक्यता आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (AICTE) आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या जागी एकच सुपर-नियामक संस्था आणून सरकार स्वायत्तता वाढवणे, कागदोपत्री काम कमी करणे आणि गुणवत्ता वाढवणे असे दावे करत आहे. मात्र प्रत्यक्ष वास्तव फारच गंभीर आहे—सत्तेचे अभूतपूर्व केंद्रीकरण, संस्थात्मक स्वायत्ततेचा पद्धतशीर नाश, कर्जाधारित निधीमुळे सक्तीचे व्यापारीकरण आणि भारतीय विद्यापीठांना थेट राजकीय नियंत्रणाखाली नेणे. ही काही शैक्षणिक सुधारणा नाही तर हा भारताच्या बौद्धिक पायाभूत रचनेवर केलेला हुकूमशाही स्वरूपाचा हस्तक्षेप आहे. सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणारे शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यापीठे अस्तित्वाच्या संकटात सापडतील, अशी ही रचना आहे. परिणामी शैक्षणिक स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि लोकशाही मूल्यांवर गंभीर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. कागदोपत्री पाहता, हे विधेयक UGC, AICTE आणि NCTE यांना एका नियामक संस्थेत विलीन करते. स्वतंत्रपणे पाहता ही कल्पना एकमेकांवर येणारी कामे कमी करू शकली असती; मात्र प्रस्तावित आयोगाची रचना पाहिली असता खरा उद्देश स्पष्ट होतो. केंद्र सरकारकडे सत्ता एकवटणे. आयोगावर मोठ्या मंत्रालयांचे सचिव, सरकारने नेमलेले नियामक प्रमुख आणि सरकारच्या नियंत्रणाखाली निवडलेले कुलगुरू यांचे वर्चस्व असेल. १२ ते १५ सदस्यांपैकी फक्त २ किंवा ३ सदस्य स्वतंत्र शैक्षणिक असतील, तेही सरकारच नेमणार. UGC कायद्यात काही प्रमाणात प्रशासकीय व शैक्षणिक प्रतिनिधित्वाचा समतोल होता. नव्या रचनेत शैक्षणिक आवाज दुय्यम ठरणार आहे. संसदेच्या स्थायी समितीने फेब्रुवारी २०२५ मध्ये या व्यवस्थेला "अतिरिक्त केंद्रीकरण" असे संबोधले होते; मात्र सरकारने हा इशारा दुर्लक्षित केला. विधेयकातील कलम १५(३)(ग) नुसार आयोगाला केंद्र सरकारच्या धोरणांनुसारच कार्य करावे लागेल आणि कोणताही मतभेद झाल्यास सरकारचा निर्णय अंतिम राहील. त्यामुळे 'स्वायत्त नियामक संस्था' ही संकल्पनाच अर्थहीन ठरते. अभ्यासक्रम, शुल्क, मान्यता आणि मूल्यांकन हे सर्व काही सरकारच्या इच्छेनुसार ठरवले जाईल.सरकार स्वायत्ततेची भाषा करत असले, तरी हे विधेयक त्याच्या अगदी उलट परिणाम घडवते. सध्या विद्यापीठांना काही प्रमाणात अभ्यासक्रम ठरवणे, शिक्षकांची नियुक्ती करणे आणि संशोधन करणे याचे स्वातंत्र्य आहे. नव्या व्यवस्थेत हे सर्व अधिकार लोप पावतील. नव्या आयोगाला शुल्क व अभ्यासक्रमांवर कठोर नियंत्रण, संस्थांना मान्यता देणे किंवा रद्द करणे, नियमभंगास दंड व कारावासाची तरतूद, तसेच तात्काळ संस्थाबंदीचे आदेश देण्याचे अधिकार असतील. सर्व संस्थांवर एकसारखे नियम लादले जातील. यशपाल समिती (२०१०) आणि राष्ट्रीय ज्ञान आयोगाने (२००९) अशा अतिरिक्त नियंत्रणावर आधीच टीका केली होती. मात्र हे विधेयक त्या त्रुटी दूर करण्याऐवजी त्यांना अधिक घट्ट करते. यामुळे नवोन्मेष करणारी विद्यापीठे दडपली जातील, ग्रामीण महाविद्यालये बंद पडतील आणि सरकारवर टीका करणारे संशोधन "अनुपालन तपासणी" च्या नावाखाली रोखले जाईल. स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी विद्यापीठे मतभेद, संशोधन आणि सर्जनशीलतेपासून दूर राहतील.या विधेयकातील सर्वात मूलभूत बदल म्हणजे UGC कडील अनुदान देण्याचे अधिकार काढून घेणे. आता शिक्षणासाठी अनुदानाऐवजी कर्जाची व्यवस्था केली जाणार आहे. HEFA मार्फत विद्यापीठांना कर्ज घ्यावे लागेल आणि ते व्याजासह फेडावे लागेल. यामुळे विद्यापीठे व्यापारी संस्थांसारखी वागू लागतील. शुल्क वाढवणे, स्ववित्तपोषित अभ्यासक्रम वाढवणे आणि उत्पन्न न देणारे विषय बंद करणे अपरिहार्य ठरेल. याचा सर्वाधिक फटका अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांना बसेल. सार्वजनिक विद्यापीठेच त्यांच्या शिक्षणाचा आधार असल्याने शुल्कवाढ त्यांना शिक्षणाबाहेर ढकलू शकते किंवा कर्जाच्या ओझ्यात अडकवू शकते. मानव्यविद्या, समाजशास्त्र, कला, मूलभूत/विज्ञान आणि प्रादेशिक भाषा यांसारखे विषय हळूहळू नष्ट होतील. हे आकस्मिक झालेले नसून जाणीवपूर्वक घडवलेले आहे. महागडे शिक्षण म्हणजे प्रवेश मर्यादित करणे आणि ज्ञाननिर्मिती अभिजनांच्या नियंत्रणात ठेवणे. शिक्षण हा समवर्ती यादीतील विषय असतानाही या विधेयकात राज्यांची भूमिका अत्यंत मर्यादित ठेवण्यात आली आहे. आयोगात राज्यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे. निधी, मान्यता आणि धोरणनिर्मितीचे सर्व अधिकार केंद्र सरकारकडे असतील. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांनी उभारलेली सक्षम सार्वजनिक विद्यापीठे दिल्लीकेंद्रित आदेशांच्या अधीन जातील. यामुळे प्रादेशिक भाषा, स्थानिक इतिहास आणि स्थानिक संशोधन नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. UGC अनुदाने काढून टाकल्याने ६०:४० केंद्र—राज्य निधी मॉडेलकडे ढकलले जाण्याचा धोका निर्माण होतो. भारतीय उच्च शिक्षणासमोरील खऱ्या समस्या वेगळ्याच आहेत. त्या पुढीलप्रमाणे १. शिक्षणासाठी अपुरा निधी (GDP च्या केवळ ३.१%), २. राजकीय हस्तक्षेपातून कुलगुरू नियुक्त्या, ३. कंत्राटी शिक्षकांची वाढ, ४. संशोधनासाठी अपुरा निधी, ५. शैक्षणिक स्वातंत्र्यावर आघात आणि ६. शैक्षणिक आकडेवारीचे दडपण. या कोणत्याही समस्यांवर हे विधेयक उपाय सुचवत नाही. उलट, राजकीय नियंत्रण अधिक मजबूत करते.या विधेयकामुळे अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि संगणकशास्त्र यांसारख्या बाजाराभिमुख विषयाला प्रोत्साहन मिळेल, तर मानव्यविद्या, तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, कला आणि प्रादेशिक भाषा दुर्लक्षित ठरतील. खरे तर हे विषय चिकित्सक विचार, नैतिक जाणीव आणि सत्तेला प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित करतात. त्यामुळे त्यांना कमकुवत करणे ही एक धोरणात्मक प्रक्रिया आहे. भारत हा विचारवंत नव्हे, तर केवळ तंत्रज्ञ निर्माण करेल. जगातील यशस्वी विद्यापीठे स्वायत्ततेच्या आधारावर उभी आहेत. भारत मात्र हुकूमशाही व्यवस्थांकडे झुकणारी शिक्षणरचना उभारत आहे.पुढील दिशा : खरी शैक्षणिक सुधारणा पुढील बाबींवर आधारित असायला हवी.* शिक्षणासाठी GDP च्या किमान ६% निधी,* अनुदानाधारित सार्वजनिक उच्च शिक्षण,* राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त स्वायत्तता,* राज्यांचा सक्रिय सहभाग,* शिक्षक व विद्यार्थ्यांचे संरक्षण आणि * संशोधनासाठी विश्वासार्ह व पारदर्शक आकडेवारी हे विधेयक यापैकी एकाही मुद्द्यावर उत्तर देत नाही. उलट, शिक्षणाचे व्यापारीकरण करून लोकशाही मूल्यांना धोका निर्माण करते. म्हणूनच हा कायदा मागे घ्यावा आणि संविधान, शिक्षण व लोकशाही बळकट करणाऱ्या खऱ्या सुधारणा राबवाव्यात. इतिहास या विधेयकाकडे शैक्षणिक सुधारणा म्हणून नव्हे, तर शैक्षणिक अधीनतेचे प्रतीक म्हणून पाहील.


**मराठी अनुवाद : प्रा.प्रियदर्शन भवरे**,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात.


साभार: आउटलुक, १४ डिसेंबर २०२५

## गराडा आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची कृषी प्रदर्शनाला भेट




**कन्नड (अरुण थोरात) :** कै. गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रम शाळा गराडा येथील वर्ग ८ वी च्या विद्यार्त्यानीं, FALI-भारताचे भविष्यातील कृषी क्षेत्रातील नायक या अभ्यासक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे ॲग्रोवन कृषिप्रदर्शनास भेट दिली. शाळेतील ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम राबविला जातो. शालेय अभ्यासा व्यतिरिक आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे तंत्र तसेच मार्केटिंग, माती परीक्षण व विविध प्रत्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परिपूर्ण करण्याचे काम यातून होत आहे.या अभ्यासक्रमचाच एक भाग म्हणून कृषी विषय शिक्षक गौरव पडघन, अनिता चव्हाण व रुपाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन सर्व आधुनिक उपकारणांची जिज्ञासापूर्वक महिती घेऊन प्रत्यक्ष हाताळली.या प्रदर्शनात अनेक नवनवीन उपकरणे, शेतीस उपयुक्त वस्तू, बी - बियाणे, खाद्यपदार्थ मांडण्यात आले होते.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ जानेवारी २०२६


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास २०२६ साठी करिअर कट्टा सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालय ए ग्रेड देऊन सन्मानित



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आयोजित करियर कट्टा अंतर्गत दरवर्षी महाराष्ट्रातून सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालय म्हणून निवड केली जाते.सन २०२६ या वर्षासाठी उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास पुन्हा एकदा सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालय म्हणून ए ग्रेड देऊन निवड केली आहे. संपूर्ण मराठवाड्यातून ए ग्रेड प्राप्त करणार श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय एकमेव महाविद्यालय आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे चे कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते सेंट्रल एक्सलन्स महाविद्यालय सन्मानपत्र स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, करिअर कट्टा समन्वयक डॉ एस. पी. पसरकल्ले, डॉ सी. डी. करे. यावेळी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर प्राचार्य डॉ. महामुनी यांची उपस्थिती होती.बारामती येथे ३ ते ७ जानेवारी दरम्यान आयोजित पाच दिवसीय करिअर कट्टा अधिवेशन समारोप आणि धोरण निश्चिती कार्यशाळेत महाराष्ट्रातील करिअर कट्ट्याच कार्य करणाऱ्या महाविद्यालयाच्या कामगिरी नुसार सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालय म्हणून निवड आणि सन्मानपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. संजय अस्वले, महाविद्यालयीन समन्वयक आणि 13 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. करिअर कट्टा उपक्रमांतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने विद्यार्थी संसद, उद्योजकता विकास क्लब, इमोशनल इंटेलिजन्स क्लब, फायनान्शियल लिटरसी क्लब या अंतर्गत विविध उपक्रम वर्षभर राबवत आहे. त्याचबरोबर करिअर कट्टा अंतर्गत स्पर्धा परीक्षा स्वतंत्र केंद्र, पोलीस अकॅडमी प्रशिक्षण केंद्र, स्वतंत्र अभ्यासिका, इंक्युबॅशन सेंटर, स्मार्ट क्लासरूम करिअर कट्ट्याच्या वतीने महाविद्यालयात उपलब्ध करून दिलेले आहेत

## गावखेड्यातील लिहित्या हातांना बळ देणारे व्यासपीठ : 'तिफण कविता महोत्सव'

कन्नड जि. छत्रपती संभाजी नगर येथे रविवारी 11 जानेवारीला सुप्रसिद्ध कवी, गीतकार यांच्या नारायण सुमंत यांच्या अध्यक्षतेखाली भरणा-या आठव्या 'तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाचा' उदघाटक म्हणून....साहित्य संमेलन म्हणजे वाचकांची थेट लेखक, त्यांचे साहित्य आणि त्यांचे विचार या सर्वांची एकत्रित मैफल. वाचक हा मूक-लेखक असतो आणि लेखक हा मूक-रसिक असतो असं म्हणतात. अशा सर्वांचं एकत्र येणं म्हणजे साहित्य संमेलन, अशा या उत्सवात सारे भेद दूर सारून सर्वजण एकत्र येतात. प्रांत, जात, धर्म, विचार, आचार अशा कुठल्याच भिंती आणि भेद तिथे नसतात. इथे दिल्या घेतल्या जाणाऱ्या विचारधनातून समृद्ध होण्याचे भाग्य आपणास लाभते.साहित्य संमेलनातून स्फूर्ती, प्रेरणा घेऊन नवे लेखक, कवी घडतात. नव्याने सकस लिहिणाऱ्या अनेकांना नवी उर्मी अशा संमेलनातून मिळते. आज खऱ्या अर्थाने समृद्ध असलेल्या अनेक मराठी साहित्यिकांना संमेलनांनी उत्तेजन दिलेले आहे. मात्र असे असताना यातील किती साहित्यिकांनी स्वखर्चाने नव्याने लिहित्या हातांच्या लेखणीला बळ दिलं हा प्रश्नही अनुत्तरित आहे. महाराष्ट्रात दरवर्षी वेगवेगळ्या गाव-खेड्यांसह नगरांमधून विभागीय, प्रादेशिक अशी अनेक छोटी-मोठी संमेलने भरतात. ती नवीन लेखक, कवी घडविण्याच्या दृष्टीने अधिक उपयुक्त, फलदायी ठरत आहेत. महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ, खानदेश मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र अशा प्रादेशिक अस्मिता जोपासत त्या त्या परित्तरामध्ये मराठी भाषेचा उचित जागर होतो. खरंतर अखिल भारतीय साहित्य संमेलनाची समृद्ध परंपरा अखंडितपणे चालू असताना ही छोटी संमेलने अनेक लिहिणाऱ्यांना सामावून घेतात. परिसवांदातून वाङ्मयीन चर्चा होते. अलीकडच्या दहा-वीस वर्षांच्या काळामध्ये वाढती महागाई, चळवळीतील सवतेसुभे, साहित्य संमेलनाच्या संयोजनातील गैरसाहित्यिक व्यक्तिंचा प्रभाव हे अडसर स्पष्टपणे जाणवतात. अशा संमेलनाच्या आयोजनात्तील सामाजिक उणीवा, मदतीचे आखडते हात हे सगळे चित्र पाहता साहित्यविषयक उपक्रम महाविद्यालयाव्यतिरिक्त फारसे होत नाहीत.मात्र अशाही परिस्थितीत कन्नडच्या सुपिक मातीत 'तिफण'रूपाने कविता बहारदार होत आहे.लोकनेते,सहकार महर्षी बाळासाहेब पवार हे मराठवाड्याची अस्मिता व विकासाची भूमिका घेऊन सतत संघर्ष करणारे लोकनेते होते. शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सहकार अशा कितीतरी क्षेत्रात आदरणीय श्री पवार साहेबांचे लक्षणीय योगदान होते. माती आणि माणसांवर जिवापाड प्रेम करणारा हा धुरंधर लढवय्या लोकनेता होता. कन्नडच्या याच लोकनेत्याच्या जन्मभूमित त्यांच्या नावे असलेल्या या वाचनालयात हा कवितेचा जागर होतोय ही त्यांना खरं तर मानवंदनाच आहे. साहेबांनी हयातभर माणसं उभी केली. अनेक माणसं मोठी केली. तिफण कविता महोत्सव म्हणजे उपेक्षित दुर्लक्षित गावखेड्यातील कवींना व्यासपीठ देणारा कवी आणि कवितेचा सन्मान करणारा लोकोत्सव. याच महोत्सवातून आजपर्यंत हजारो कवी रसिक घडले. या कविता महोत्सवाने कन्नडचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर आरूढ झाले. ही चळवळ रूजण्यासाठी सतत पाठबळ देणारे श्री मानसिंहजी पवार साहेब, प्राचार्य डॉ. विजय भोसले, अॅड. कृष्णा जाधव आणि सर्व तिफण परिवार व साहित्य प्रेमी मंडळी. तिफण कविता महोत्सव हे केवळ एक व्यासपीठ नाही तर ही आता एक चळवळ झाली आहे. लिहिणाऱ्यांची व वाचणाराची ही चळवळ बघता बघता आठ वर्ष होत आहे. ही अक्षर चळवळ अशीच वृद्धिंगत होत राहो. या चळवळीने माझ्या सारख्या एका सामान्य कवीचा, कवितेचा आणि एकुणच साहित्य चळवळीतील कार्यकर्त्याचा यथोचित सन्मानच केला आहे. ही माझ्या आयुष्यात अविस्मरणीय बाब आहे. माझ्या ध्यानी मनी नसतांना माझी नोंद घेऊन मला हा बहुमान दिला. या महोत्सवातून लाखो कवी घडतील असा मला विश्वास आहे.मराठवाड्यातील 'तिफण' साहित्य चळवळ तशी माझ्यासाठी नवी नाही. कन्नडच्या या मातीत शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात 'तिफण'चे सर्वेसर्वा प्रा.डॉ. शिवाजी हुसे व आम्ही अनेक समकालीन कवितेतील मित्र अनेकदा एकत्र आलो.अगदीच थंडीच्या हुडहुडीत प्रेमाच्या कविता, मातीचं दुःख शब्दांत व्यक्त करण्याचा तो काळ आजही सुखावह वाटतो. याच ओढीने तिफण ही आपली चळवळ बनली आहे. खरं तर सातत्याने ही तिफण गतिमान असल्याचा मोठा आनंद आहे. साहित्य पंढरीच्या वाटेवरला वारकरी म्हणून जिथं जिथं चळवळ रूजते,ती रूजवणारा प्रत्येक कार्यकर्त्यात मला स्वतःला मी पहातो. वैजापूर - कन्नड हा साहित्याचा संवाद सेतूच म्हणावा असा परस्परपूरक नवोदित ग्रामीण साहित्यिकांना प्रेरक ठरला.खरं तर नवोदितांना कुणी व्यासपीठ व संधी देत नाही. परिणामी त्यांचे दर्जेदार साहित्य असूनही ते नावारूपास येत नाही. साहित्य क्षेत्रात प्रचंड मक्तेदारी होती आजही आहे. याचा फटका कमी अधिक प्रमाणात आम्हास ही बसला आहे. त्यामुळेच आम्ही ही व्यासपीठे निर्माण केली. ती स्वतः साठी नाही तर या वंचितांना न्याय देण्यासाठी. तिफण कविता महोत्सव हे त्याचेच प्रतिक आहे. तिफणने ही मक्तेदारी मोडित काढून हे व्यासपीठ खुले केले. या अर्थाने तिफणकार डॉ. शिवाजी हुसे हे मूकनायक आहेत. त्यांनी सतत सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन वाटचाल केली. त्यामुळेच कवितेचे हे भरघोस पीक आज दिसून येत आहे. आज साहित्य क्षेत्रात कन्नडची ओळख कवी आणि कवितेचे गाव अशीच झाली आहे. हे या चळवळीचे यश आहे.मराठवाड्यातील वैजापूर तालुक्यात सुरूवातीची कर्मभूमी म्हणून ग्रामीण भागात 'साने गुरुजी प्रतिष्ठान'च्या माध्यमातून सतत पंधरा वर्ष ग्रामीण साहित्याची चळवळ राबवता आली. खान्देश 'कसमादे' या उत्तर महाराष्ट्रातील मायभूमीतील गावापासून नोकरीसाठी दूर आल्यानंतर माय मातीतली संस्कारशील मशागत उपयुक्त ठरली. नोकरीच्या निमित्ताने मराठवाड्यात सुसंवादी स्वभाव, लोकसंपर्क, संघटन कौशल्यामुळे नव्या लिहिणाऱ्या भावंडांना व काही धडपड्या समविचारी मित्रांना घेऊन 'राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन' नावाचं पहिलं पाऊल टाकता आलं. ज्या भूमीतून येतो त्या भूमीने भूमिका दिलेली असते. माझ्या मालेगाव ग्रामीण साहित्य संमेलन समिती चळवळीतील कार्यकर्ता म्हणून केलेल्या कामासह इथल्या साहित्यिकांसह मिळालेले अनुभव कर्मभूमीत उपयुक्त ठरले. मराठवाड्यातील साहित्याच्या सुपीक भूमीत सलग सहा ग्रामीण साहित्य संमेलने घेता आली. पंधरा वर्षे मराठी भाषेचा विविध उपक्रमांनी जागर करून सारस्वतांची सेवा करता आली हा अतिशय सुखद आनंद आहे.संमेलन म्हणजेच उत्सव.. ! त्यामुळे तिफण परिवाराची सर्वांची धडपड नेहमीच बघतोय. या चळवळीवर होणारी चर्चा, डॉ. हुसे व सर्व मित्रांची राज्यभरातील विविध संमेलनातील मुशाफिरी सुखद अशी आहे. मातीशी नाळ घट्ट ठेवून नदीवर प्रेम करणा-या 'तिफण' चा हा गोतावळा आता सर्वदूर पोहोचला आहे.( लेखक साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.)

## कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव

कर्मभूमी झाली मायभूमी
मायभूमीतून पेरली लेखणी
लेखणीच्या गावातून फुलली नातीगोती
माणसा-माणसाशी जुळली माणुसकीची नाती
मायभूमीला आमच्या साहित्यभूमीचं नाव
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

कन्नड भूमीला कला-गुणांचा रंग
पंचक्रोशीत वाहतो साहित्याचा गंध
लेखणीच्या रंगाला साद घाली संगीताचा सूर
कलाकारांच्या कलागुणांना मिळाला येथे वाव
गावोगावातून पुढे येतंय साहित्यिकांचं नाव
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

मानसिंह बापूंच्या संकल्पनेतून
कलावंतांच्या सेवेत उभे
बाळासाहेब पवार फाउंडेशन
साहित्यिक अन् कलावंतांनी
वाढवली कन्नड नगरीची उंच शान
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

तिफणकार शिवाजी हुसे तिफण घेऊन
साहित्य पेरले कन्नडच्या रानात
साहित्यिक उगवून आले कन्नडच्या मातीत
'तिफण' त्रैमासिकेच्या अक्षरवाटेवर
प्राचार्य डॉ. विजय भोसले यांची साथ
अॅड. कृष्णा काका जाधव आमचं पाठबळ

घराघरातून तयार होतोय मातीतला कलाकार
कवी-लेखकांचे पुढे येण्या वारसदार
खेड्यापाड्यातून, तांडे-वस्ती-वाड्यातून
पुढे येतंय जातिवंत कलाकारांचं नाव
मायभूमीला आमच्या साहित्यभूमीचं नाव
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

नव्या-जुन्या कलाकारांना
मिळालं येथे हक्काचं व्यासपीठ
आधुनिक वाचनालय अन्
वाचनचळवळ उभी करण्यास
रामकृष्ण पवार यांचं योगदान
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

सहकार महर्षी बाळासाहेब पवार फिरतं ग्रंथालय
गावोगावी, दारोदारी जाऊन बांधतंय पुस्तकांशी नातं
सात सुरांच्या संगतीला लेखणीचा आरसा
वाढत चाललाय आता साहित्य-कलेचा वारसा
जग घेईल अभिमानाने कन्नड भूमीचं नवं नाव
कन्नड आमचं साहित्यिकांचं गाव...

**- लक्ष्मण वाल्डे (कन्नड)**
छत्रपती संभाजीनगर
मो. नं. : ८८८८६०६०६८


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ जानेवारी २०२६

# सहकार महर्षी, शंकरराव मोहिते पाटील : अष्टपैलू व अलौकिक व्यक्तिमत्व

**स**हकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांची जयंती १४ जानेवारी २०२६ रोजी मकर संक्रांती दिवशी अकलूज येथे मोठ्या विविध विविध कार्यक्रमाचे आयोजन करून संपन्न होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन . सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व त्यांच्या पश्चात समस्त मोहिते पाटील कुटुंबीयांनी व त्यांचे सहकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी यांनी केवळ अकलूज व माळशिरसच तर सोलापूर जिल्ह्यासाठी गेल्या 78 वर्षात ज्या भरीव व कायमस्वरूपी सुधारणा दिल्या व चौफेर विकास केला आहे तो केवळ अकलूज व माळशिरस तालुका व सोलापूर जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशालाही माहित आहे. परंतु त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे पारायण व्हावे व त्यातून इतरांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे व यानिमित्ताने त्यांच्या कार्याला उजाळा मिळावा व त्यांच्या ऋणातून थोडी तरी मुक्तता मिळावी या हेतूने हा लेख लिहिण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. अकलूज व माळशिरस तालुक्या बरोबरच सोलापूर जिल्ह्यात सहकार, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला,क्रीडा इत्यादी क्षेत्रात त्यांनी व समस्त मोहिते पाटील कुटुंबीयांच्या व सहकारी कार्यकर्त्यांच्या मदतीने विकासाचा ध्यास घेऊन अहोरात्र काम करून सर्वच क्षेत्रात चौफेर प्रगती केलेली दिसून येते. त्याचबरोबर उद्योग-धंदे , पर्यटन, व्यवसाय,व्यापार, वैद्यकीय क्षेत्राच्या विकासाला व प्रगतीला पूरक अत्याधुनिक सुविधा निर्माण करून अकलूज एक उत्कृष्ट मेडिकल हब, पर्यटन क्षेत्र व विख्यात बाजारपेठ म्हणून सोलापूर जिल्ह्यात अकलूजची ओळख निर्माण झाली आहे. तसेच आशिया खंडातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून अकलूजने नावलौकिक कमावलेला आहे.सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील आशिया खंडातील सर्वात मोठी ग्रामपंचायत: अकलूज यशवंत सहकारी साखर कारखान्याची निर्मिती सदाशिवनगर येथील चितळे यांच्या खाजगी साखर कारखान्याची खरेदी त्व याचे शंकर सहकारी साखर कारखान्यात रूपांतरकृषी उत्पन्न बाजार समितीशेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील शेतकरी सहकारी बँक डी.सी.सी. बँक व भू-विकास बँकेच्या माध्यमातून शेती व उद्योगधंद्याला मोठ्या प्रमाणा कर्ज पुरवठा करून विकासात हातभार जलसिंचन अंतर्गत तलाव बांधायचे काम, कालव्यांचे काम, बोअरवेल्स ,सामुदायिक विहिरी , वैयक्तिक विहिरींचे कामवीर-भाटघर व उजनी धरणाचे पाणी माळशिरस तालुक्यात शेतीसाठी फिरून माळशिरसच्या ओसाड माळरानाचे 'नंदनवनात' रूपांतर केले. ऊस, केळी, डाळिंब, द्राक्षे, आंबा इत्यादी उत्पादनात माळशिरस तालुका अग्रेसर शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ प्रताप क्रीडा मंडळ शंकर नगर सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना ऊस वाहतूक संघ शंकरराव मोहिते पाटील सहकारी सूतगिरणी राजहंस कुक्कुटपालन संघशिवकृपा कुक्कुटपालन उद्योजक सहकारी संघ शिवपार्वती फलोत्पादक सहकारी संघ विजयसिंह मोहिते पाटील दूध वाहतूक संघ सुमित्रा नागरी सहकारी पतसंस्था शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था व त्याच्यासह एकूण 7 शाखाशैक्षणिक संस्थांचे जाळेशिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज(1947)शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, अकलूज (1975)शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज(1979)सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रतिष्ठान ,धवल नगर, अकलूज (1991)शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज अंतर्गत शाखासंस्थेचे पहिले मुलांचे वस्तीग्रह (1947) : विजय वस्तीगृह , अकलूजसंस्थेची पहिली शाळा: (1947):सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज संस्थेचे पहिले महाविद्यालय (1967):शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय , पदयुत्तर अभ्यासक्रम, इंग्रजी, मराठी व इतिहास विषयात एम. ए., इलेक्ट्रॉनिक्स व ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट विषयात एम. एससी. तसेच प्राणीशास्त्र ,वनस्पतीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, इतिहास ,भूगोल, इंग्रजी अर्थशास्त्र या 7 विषयात पीएच.डी.ची सोय उपलब्ध महात्मा फुले शिक्षण शास्त्र महाविद्यालय, अकलूज टेक्निकल हायस्कूल, शंकरनगर कृषी तंत्र विद्यालय , अकलूजदुग्ध व्यवसाय तंत्रज्ञान विद्यालय , अकलूजरत्नप्रभादेवी मोहिते पाटील महिला संकुल मध्ये मुलीच्या शिक्षणासाठी स्वतंत्र कन्या शाळा गृहविज्ञान महिला महाविद्यालय, साडेसातशे सातशे मुलीची प्रवेश क्षमता असलेले महिला वस्तीगृह रत्नाई कृषी महाविद्यालय,अकलूज ( मुला मुलींचे वसतिगृह सुविधा उपलब्ध)डी. फार्मसी. कॉलेज फार्मसी कॉलेजमाळशिरस तालुक्यातील शेतकरी कामगार व मजुरांच्या मुलांची शिक्षणाची सोय त्यांच्या गावातच व्हावी या एकमेव हेतूने तालुक्यातील बहुतेक छोट्या छोट्या गावातही संस्थेने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व मुला-मुलीसाठी स्वतंत्र वस्तीगृहे सुरू केलेल्या आहेतशिक्षण प्रसारक मंडळाच्या मोजक्याच शाळा तालुक्याबाहेर खालील शाळा पुणे व सातारा जिल्ह्यात आहेत.श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक शाळा, कोथरूड, पुणे श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील माध्यमिक शाळा ,कोथरूड ,पुणे संत रामदास विद्यालय ,शिवथर घळी, जिल्हा सातारा आज वरील शाखा मधून लाखो विद्यार्थी शिकून बाहेर पडलेले असून त्यांनी आपले जीवन समृद्ध बनवले आहे.सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील चारिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट अकलूज शाखासहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकर नगर ,अकलूज डिग्री इंजिनिअरिंग व डिप्लोमा इंजीनियरिंग स्वतंत्र महाविद्यालय असून दोन्ही महाविद्यालयात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सिविल इंजीनियरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग सायन्स अँड इंजीनियरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग अभ्यास करून उपलब्ध आहेत.शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर ,अकलूज अंतर्गत शाखाग्रीन फिंगर्स स्कूल ,शंकरनगर ग्रीन फिंगर्स ग्लोबल स्कूल, खारघर ,मुंबईग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर ,शंकरनगर ग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर ,शंकरनगरग्रीन फिंगर्स कॉम्प्युटर कॉलेज शंकरनगरशिवरत्न शिक्षण संस्था यशवंत नगर अकलूज अंतर्गत शाखाशंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, शंकरनगर शिवरत्न सी.बी.एस.ई. स्कूल ,शंकरनगर शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल ,शंकरनगर फ्री विंग्स ,अकलूजविजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, अकलूज शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ,अकलूजमदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय , मंगळवेढा विजयसिंह मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, मंगळवेढाशिवरत्न बॉईज हॉस्टेल, शंकरनगर शिवरत्न गर्ल्स हॉस्टेल, शंकर नगरसहकार महर्षी मोहिते पाटील प्रतिष्ठान संचलित शाखासहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुतेप्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा प्रतापसिंह मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, अकलूजवरील सर्व शैक्षणिक संस्था मधून लाखो विद्यार्थी शिकून विविध क्षेत्रांमध्ये सेवा देत आहेत.पर्यटन क्षेत्र विकासपर्यटनच्या दृष्टीने चालना मिळावी म्हणून अकलूज किल्ल्याचा जिर्णोद्धार व अत्याधुनिकरण व सुशोभीकरणअकलूज किल्ला शिवसृष्टी निर्मिती शिवपार्वती मंदिर ,शंकर नगरसयाजी राजे वॉटर पार्क शिवामृत गार्डन भव्य अकलाई देवी मंदिर व परिसर विकास अर्धनारी नटेश्वर मंदिर, वेळापूरसाईबाबा मंदिर राम मंदिर जैन मंदिर एक मुखी दत्त मंदिर वरील सर्व मंदिराच्या ठिकाणी भक्ती निवास सुविधा उपलब्ध* अकलूज बाजारपेठ विकास आत्ताचे डी- मार्ट येण्यापूर्वीच अकलूज1995 मध्ये शिवशंकर बझार सुरू करण्यात आले असून याचे मुख्य कार्यालय अकलूज येथे असून गांधी चौक, , यशवंत नगर, वेळापूर, श्रीपुर ,नातेपुते व पिलीव येथे अशा एकूण आठ शाखा असून त्याची वार्षिक उडाल ८० कोटी आहे. ज्या ठिकाणी सर्व प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू एकाच ठिकाणी योग्य दरात मिळतात. अकलूज बाजारपेठेतील टपऱ्या काढून त्या ठिकाणी ग्रामपंचायत अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यासारख्या संस्थांच्या मदतीने पक्के स्लॅबचे बांधकाम केलेले हजारो व्यापारी गाळे अत्यल्प भाड्यात उपलब्ध केले माळशिरस तालुका व शेजारील इंदापूर, फलटण, सांगोला, पंढरपूर, माढा, मान इत्यादी तालुक्यातील लोकांसाठी अकलूजची बाजारपेठेत अगदी किरकोळ वस्तू पासून ते विविध ब्रॅण्डेड कंपनीच्या महागड्या गाड्याचे शोरूम उपलब्ध आहेत बांधकामासाठी आवश्यक ते बांधकाम साहित्य, इलेक्ट्रिक साहित्य प्लंबिंग साहित्य योग्य दरात उपलब्ध बांधकाम करणाऱ्या कंपन्या, इंजिनियर्स , आर्किटेक्टस, इंटिरियर डिझायनर, इंटेरियर डेकोरेटर इत्यादी सेवा उपलब्धया बाजारपेठेच्या विकासासाठी छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी व्यवसाय व उद्योगधंद्यासाठी बँका व पतसंस्थांच्या माध्यमातून आवश्यक तो कर्जपुरवठा सहज उपलब्ध शेजारच्या तालुक्यातून अकलूजला यायला उत्तम रस्ते व वाहतूक व्यवस्था अकलूज येथे शुद्ध पिण्याचे पाणी, निवास व भोजनासाठी उत्तम दर्जाचे हॉटेल्स व्यापाऱ्यांना संरक्षण मोठ्या प्रमाणात दरवर्षी होणारा घोडेबाजार देशभर प्रसिद्ध. अकलूज : मेडिकल हबॲलोपॅथी आयुर्वेदिक व होमिओपॅथी इत्यादी प्रकारच्या वैद्यकीय सेवा मोठ्या प्रमाणामध्ये अकलूज मध्ये उपलब्ध असून अनेक हृदयरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, मनोरुग्णतज्ञ, अस्थिरोग तज्ञ,डेंटल सर्जन्स व सुसज्ज हॉस्पिटल्स यामुळे आता अकलूजचे मेडिकल हब म्हणून प्रसिद्धी झाली आहे तसेच अकलूज मध्ये सर्व प्रकारची औषधे उपलब्ध असतात व तयारी होतात.बँका व पतसंस्था मार्फत गृह कर्ज हॉस्पिटल बांधकाम कर्ज मेडिकल स्टोअर टाकण्यासाठी कर्ज सहज उपलब्ध सांस्कृतिक व कला क्षेत्रातील कार्य कला व सांस्कृतिक विकासांतर्गत राज्यस्तरीय तमाशा परिषद स्थापना राज्यस्तरीय तमाशा महोत्सव आयोजनराज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धा राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा विभागीय स्तरावर नृत्य स्पर्धा शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी नृत्य ,अभिनय, कला, क्रीडा, एन.एस.एस., एन.सी.सी. इत्यादी बाबत विशेष प्रशिक्षणाचे वेळोवेळीआयोजन त्यामुळे परिसरातील सैराट चित्रपटातील आर्ची ची भूमिका करणारी रिंकू राजगुरू स्वराज्य रक्षक संभाजी मालिकेत बहिर्जी नाईक यांची भूमिका करणारे अजय तपकिरे , सोमनाथ वैष्णव तसेच सेंट्रल युनिव्हर्सिटी सागर येथे नाट्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून काम करणारे डॉ. अल्ताफ मुलानी, चित्रपट दूरदर्शन मालिका व शॉर्ट फिल्म आणि जाहिरात दिग्दर्शक सहदेव घोलप चित्रपट कलावंत योगीराज भिसे अशी कितीतरी नावे आपल्याला सांगता येतील ज्यांनी दूरदर्शन मालिका व चित्रपटांत नावलौकिक कमवलिआहे.संस्थेमध्ये शिकलेल अनेक तरुण तरुणी डॉक्टर इंजिनियर आयुक्त उपजिल्हाधिकारी पोलीस ऑफिसर्स यासारख्या उच्चपदी कार्यरत आहेतशासकीय क्षेत्रातील सुधार पोलीस विभागीय कार्यालय विभागीय प्रांत कार्यालय स्वतंत्र आरटीओ विभाग, बांधकाम कार्यालय पाटबंधारे कार्यालयसत्र न्यायालय??अकलूज येथे अध्यायावत पोलीस वसाहतअशा प्रकारच्या विविध क्षेत्रात अनेक सुविधा निर्माण केले आहेत सर्वांची यादी करणे या ठिकाणी शक्य होणार नाही म्हणून या ठिकाणी थांबतो. त्यांचे कार्य एखाद्या महासागर एवढे आहे त्यातील एका थेंबा एवढे ही मला माहित असलेले सांगता आले. उरलेले त्यांचे कार्य ज्याला माहित आहे त्यांनी मांडण्याचा प्रयत्न करावा. ध्येयाने प्रेरित होऊन झपाटलेली व वेडी झालेली माणसे किती प्रकारचे काम करतात याचे हे सर्वोत्तम उदाहरण म्हणावे लागेल . त्यांनी समाजासाठी केलेल्या भरीव कामामुळेच तर त्यांच्या आठवणी लोकांच्या मनात आणि हृदयात कायमचा कोरल्या गेल्या आहेत, त्या कधीही पुसल्या जाणार नाहीत ,म्हणूनच त्यांना लोक कधी विसरत नाहीत. या लेखातून आजच्या पिढीतील इतर कार्यकर्त्यांना, पुढाऱ्यांना व तरुण- तरुणींना प्रेरणा मिळावी व काही प्रमाणात का होईना अशा प्रकारचे काम त्यांच्या हातून भविष्यात व्हावे हा हेतूही या लिखाणामागे आहे. अकलूजच्या सर्वांगीण विकासामुळे आज आलेली संपन्नता,समृद्धी व आधुनिकता या पाठीमागे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व माननीय आक्कासाहेब यांची कार्यप्रेरणा प्रोत्साहन व आशीर्वाद सतत चांगले कार्य करणाऱ्याच्या पाठीशी सतत असल्याची जाणीव होत असते, याचा मी स्वतः शंकरराव मोहिते महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून पंचवीस वर्षा पेक्षा अधिक काळ काम करत असताना अनुभवले आहे. हे या ठिकाणी मी अत्यंत नम्रपणे नमूद करू इच्छितो. धन्यवाद.

जय महाराष्ट्र.

**प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख,**
पुणे 14 फेब्रुवारी 2026

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ जानेवारी २०२६


# मानवी तस्करी : आधुनिक गुलामगिरीविरुद्ध माणुसकीचा लढा

दरवर्षी 11 जानेवारी रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिन' हा केवळ एखादा स्मरणदिन नसून तो समाजाच्या सामूहिक अंतरात्म्याला जागे करणारा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क यांची मूल्ये जपत पुढे चालणाऱ्या आधुनिक जगात आजही लाखो स्त्री-पुरुष आणि मुले खरेदी-विक्रीच्या वस्तूसारखी वागवली जातात, ही बाब आपल्या सामाजिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. मानवी तस्करी ही काही गुन्हेगारांची विकृती नसून ती दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी, स्थलांतर, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली खोलवर रुजलेली सामाजिक समस्या आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी स्वरूपात न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते. मानवी तस्करी म्हणजे एखाद्या व्यक्तीला फसवणूक, आमिष, धमकी, दबाव किंवा हिंसेच्या माध्यमातून तिच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन तिच्याकडून शोषणात्मक काम करून घेणे. हे शोषण लैंगिक असू शकते, जबरदस्तीची मजुरी असू शकते, घरगुती गुलामगिरी, बालमजुरी, भीक मागणे, अवयव विक्री किंवा सक्तीच्या विवाहाच्या स्वरूपातही ते आढळते. या प्रक्रियेत माणसाचे स्वातंत्र्य, ओळख आणि मानवी प्रतिष्ठा पूर्णपणे नष्ट होते. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ज्या समाजात सत्ता, संसाधने आणि संधी काही मोजक्या गटांकडे केंद्रीत असतात, तिथे दुर्बल घटकांचे शोषण अपरिहार्यपणे वाढते आणि मानवी तस्करीसारख्या अमानवी प्रथा बळावतात. भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग, लिंग आणि प्रदेश यांच्या आधारे विभागलेली आहे. या विषम सामाजिक रचनेमुळे अनेकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या समान संधी मिळत नाहीत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीतील अनिश्चित उत्पन्न, आदिवासी भागातील विकासाचा अभाव आणि शहरी झोपडपट्ट्यांतील असुरक्षित जीवन यामुळे लाखो लोक रोजीरोटीच्या शोधात स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या प्रवासातच दलाल आणि तस्कर गरीब व असहाय लोकांना चांगल्या नोकरीचे, शिक्षणाचे किंवा सुरक्षित आयुष्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढतात. विशेषतः महिला, मुले, आदिवासी आणि स्थलांतरित कामगार यांच्याकडे माहिती, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक पाठबळ कमी असल्याने ते अधिक असुरक्षित ठरतात. स्त्री आणि मुलींची तस्करी ही मानवी तस्करीचे सर्वात क्रूर रूप मानले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीच्या शरीराकडे आणि श्रमाकडे वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती अजूनही खोलवर रुजलेली आहे. याच मानसिकतेतून लैंगिक तस्करीला खतपाणी मिळते. अनेक मुली प्रेमजाळे, खोटी लग्ने, नोकरीचे आमिष किंवा थेट अपहरणाद्वारे वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात. त्यांच्या आयुष्यावर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर खोल जखमा उमटतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही केवळ काही गुन्हेगारांची कृत्ये नसून स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सांस्कृतिक रचनेचे अपयश आहे. बाल तस्करी ही तर समाजाच्या नैतिक अधःपतनाची परिसीमा आहे. शिक्षण, संरक्षण आणि प्रेमाचा हक्क असलेल्या मुलांना बालमजुरी, भीक मागणे, घरगुती कामे किंवा लैंगिक शोषणासाठी वापरले जाते. अनेक वेळा अत्यंत गरीब कुटुंबेही आपल्या असहायतेमुळे दलालांच्या फसवणुकीला बळी पडतात. समाजशास्त्र सांगते की मुलांचे शोषण हे सामाजिक सुरक्षा जाळ्याच्या अपयशाचे द्योतक आहे. जेव्हा राज्य आणि समाज कुटुंबांना मूलभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा मुले तस्करीच्या जाळ्यात अडकतात. कामगार तस्करी आणि जबरदस्तीच्या श्रमांची समस्या ही आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेची काळी बाजू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार कर्ज, आमिष किंवा फसवणुकीमुळे गुलामासारखे राबवले जातात. वीटभट्ट्या, बांधकाम, शेती, कारखाने आणि घरगुती कामांमध्ये त्यांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. जागतिकीकरणामुळे स्वस्त श्रमांची मागणी वाढली असून त्याचा फायदा तस्कर घेतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे आर्थिक विषमतेचे आणि कामगारांच्या दुर्बलतेचे द्योतक आहे. डिजिटल युगात मानवी तस्करीचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन जाहिराती आणि बनावट भरती संस्थांच्या माध्यमातून तरुणांना नोकरी, मॉडेलिंग किंवा परदेशी शिक्षणाचे आमिष दाखवले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे आज जागरूकता ही केवळ भौतिक जगापुरती मर्यादित न राहता डिजिटल अवकाशातही तितकीच महत्त्वाची आहे. माहितीची असमानता आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर हे नव्या प्रकारच्या सामाजिक शोषणाचे माध्यम ठरत आहेत. भारतात मानवी तस्करीविरोधात कायदे आणि योजना अस्तित्वात असल्या तरी अंमलबजावणीतील त्रुटी मोठे आव्हान ठरतात. पोलिस, न्यायव्यवस्था आणि सामाजिक संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव, तसेच पीडितांविषयी असलेला सामाजिक कलंक, पुनर्वसनाच्या प्रक्रियेला अडथळा आणतो. तस्करीतून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा स्वीकार मिळणे कठीण जाते, आणि त्यामुळे अनेकदा ते पुन्हा शोषणाच्या चक्रात अडकतात. या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिनाचे महत्त्व अधिक ठळक होते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी प्रतिष्ठेचे रक्षण ही केवळ सरकारची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. गरिबी निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि कामगार हक्कांचे संरक्षण ही मानवी तस्करीविरोधातील सर्वात प्रभावी साधने आहेत. शाळा, महाविद्यालये, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था यांनी या विषयावर सातत्याने जनजागृती करणे आवश्यक आहे. समाजशास्त्र आपल्याला शिकवते की मानवी तस्करी ही वेगळी समस्या नसून ती आपल्या सामाजिक रचनेतील दोषांचे प्रतिबिंब आहे. म्हणून तिचे उच्चाटन करायचे असेल तर आपल्याला अधिक समतावादी, संवेदनशील आणि न्याय्य समाज घडवावा लागेल. 11 जानेवारी हा दिवस आपल्याला केवळ जागरूक करत नाही, तर कृतीसाठी प्रेरित करतो. कारण ज्या समाजात माणूस माल म्हणून विकला जातो, त्या समाजात कोणाच्याही स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. मानवी तस्करीविरुद्धची लढाई म्हणजे माणुसकीच्या रक्षणाची लढाई आहे, आणि ती आपणा सर्वांची आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra५@gmail.com

## खुलताबाद तालुक्यात निरगुडी बु पिंप्री शिवारात मोटार-केबल चोरांचा सुळसुळाट

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यामध्ये शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारी आणी केबल चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे,ज्यात शेतकरी हवालदिल झाले आहेत आणि विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील, खुलताबाद तालुक्यातील निरगुडी बु पिंप्री या शिवारात चोऱ्या वाढल्या असून, चोरट्यांनी शेतीपंपासह केबल्स यावर लक्ष केले आहे. ज्यात वैजीनाथ घोंगते यांची विहीरीतील मोटर व केबल दिनांक १०/०१/२०२६ रोजी मध्यरात्री चोरट्यांनी चोरून नेली आहे अण्णा देहाडे यांची मागील महिन्यात,आणी ज्ञानेश्वर बारगळ (बोअरवेल) मधील मोटर केबलसह ०१ एप्रिल २०२५ रोजी या ३ शेतक-यांच्या मोटारी चोरीला गेल्या आहेत प्रत्येक वेळी शेतक-याला २५ ते ३० हजार रुपये खर्च करुन विद्युत मोटर विकत घ्यावी लागते यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक टंचाईचा सामना करावा लागतो व जर विद्युत मोटारी आणी केबल चोरणारी टोळी सापडल्यास चांगलाच चोप दिला जाईल आणी नंतर पोलीसांच्या हवाली केले जातील असा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे. त्याचबरोबर गावचे पोलीस पाटील गंगाराम मेंगाळ यांनी सर्व शेतक-यांना सावधगिरी बाळगावी असे आवाहन केले आहे.

## मत नोंदवा हिताचे

चला चला दादा भाऊ
मतदान सारे करू
बलशाली भारताच्या
विकासाची कास धरू.

घ्यावे जाणून किंमत
तुम्ही आपल्या मताचे
घरी बसू नका कोणी
मत नोंदवा हिताचे.

पाच वर्षातून येतो
सण निवडणुकीचा
सदोदित दाखवावे
बळ हो लोकशाहीचा.

एका मताची किंमत
सत्ता बदल करतो
एका मतामुळे सुद्धा
उमेदवार हो पडतो.

मत देऊन आपण
चला संविधान तारू
मतदान करूनच
नालायक दूर सारू.

मत करा तुम्ही सारे
बळ मिळेल उदंड
लोकशाही भारताला
सदा ठेवील अखंड.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## झाडांची पानं

बेलाची पानं
महादेवाच्या पिंडीवरी
आंब्याच्या पानांचे
तोरण दिसते दारी

नागवेलीच्या पानांचा
सजतो खास विडा
सर्दी.पडसं होता
गुणकारी तुळस काढा

दसऱ्याच्या दिवशी
आपट्याच्या पानाचा मान
केळीच्या पानावर
जेवण होते छान

रक्त शुद्ध करूया
कडूनिंबाची पानं खाऊन
गणपतीला प्रसन्न करू
एकविस दुर्वा वाहून

रोजच्या जीवनात
पानांचे महत्त्व फार
निसर्गाचे आपल्यावर
अनंत उपकार



**- रवींद्र व्ही.चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. 9011559106


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103